परमाणु उर्जा केन्द्रीय विद्यालय-6,मुंबई

विषय- मराठी (द्वितीय भाषा)

इयत्ता-६ वी　　　　　　　　　　गुण-80

दिनांक- 13-09-2023　　　　　　　　　　वेळ-३ तास

---

विभाग 'अ'

* सर्व प्रश्न सोडवणे.

प्रश्न १अ) खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. 6

रत्नागिरी जिल्ह्यातील प्रियंका सुट्टीमध्ये आई व अमित सोबत मामाच्या गावी गेली.एके दिवशी ती कपडे धुण्यासाठी आई व अमितसोबत नदीवर गेली असताना काठावर खेळणारा अमित पाय घसरून नदीच्या पाण्यात पडला व बुडू लागला.आई घाबरून गेली. प्रियांकाने प्रसंगावधान राखून धुण्यातील एक साड़ी घेतली. साड़ीचे टोक तिने अमितकडे फेकले.अमितने ते टोक पकडले. प्रियांकाने साड़ी सावकाश ओढून घेतली व अमितचे प्राण वाचवले.प्रियांकाच्या धाड़साची दखल घेऊन तिला 'बालशौर्य पुरस्कार ' देऊन गौरविण्यात आले.

१) प्रियंका सुट्टीत कुठे गेली होती? ( सोलापुर,रत्नागिरी, दापोली)
२) प्रियंका कोणाच्या गावी गेली होती? ( मामाच्या, काकाच्या, मावशीच्या)
३) कोणाचा पाय घसरला? ( प्रियांकाचा, आईचा, अमितचा)
४) प्रियंका धुणे धुवायला कुठे गेली होती? ( नदीवर,विहिरीवर, तलावावर)
५) प्रियांकाला कोणता पुरस्कार मिळाला? ( वीर , शूर, बालशौर्य)
६) नदी या शब्दाचा समानार्थी शब्द लिहा. ( विहीर, सरिता,तलाव)

आ) खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. 6

प्रभात समयी सगळे देवदर्शनाला निघाले.हवेत गारठा होता.देवळात खुप गर्दी होती.काही वेळ रांगेत उभे राहिल्यावर आत जागा झाली.आणि प्रवेश मिळाला नारायणाच्या मुखाचा

भाग सोडला तर सर्व भाग उंची वस्त्राने झाकलेला होता. मूर्ति काळया पाषाणाची होती. भोवती पुजारी बसलेले होते.समया व दिवे लावलेले होते.प्रसादाचे तबक होते. मोठमोठ्या

दानपेटया होत्या.त्यात काही नोटा टाकलेल्या होत्या.मी देवाला नमस्कार केला.

१)लेखक देव दर्शनाला केव्हा निघाले? ( दुपारी,संध्याकाळी,प्रभात)

२) मंदिरात मूर्ति कोणत्या देवाची होती? ( नारायण,शंकर, गणपती)

३) मूर्ति कशाची बनली होती? ( संगमरवर, काळया पाषाणाची, मातीची)

४) मूर्तिभोवती कोण बसलेले होते? (पुजारी, भक्त, लहान मुले)

५) तबकात काय होते? ( पैसे, प्रसाद, पानसुपारी)

६) नोटा कशात टाकलेल्या होत्या? ( तबकात,हंडीत,दानपेटीत)

प्रश्न २ अ) योग्य पर्याय निवडा. 12

१) मुग्धाच्या शाळेत ----------- समारंभ होता.(वार्षिक,बक्षिस,सत्कार)
२) पाहुण्यांचे भाषण ऐकून मुग्धा अगदी ----- झाली.(मुग्ध,गुंग,चकीत)
३) मुग्धाला बाबांनी -------- दिली होती.(वही,पेन्सिल,डायरी)
४) मुग्धाची ------- कळी फुलायला लागली.(मूक,अबोल,शांत)
५) नानाकाका -------- आपटत शेताच्या बांधावरून फिरत होते. (काठी,छत्री,घुंगुरकाठी)
६) शेतावर --------- कोपले होते.(उंदीरमामा, माऊमावशी, पक्षीदादा)
७) पिंपावरच्या फळीच्या एका टोकाला ----- ठेवली.(जिलेबी,भजी,शेव)
८) उंदरांची युक्ती पाहून नानाकाकांनी ---------- हात मारून घेतला. (हातावर,छातीवर,कपाळावर)
९) एका जंगलात बरेचसे ----- राहत होते.(पोपट,ठेंगू,राक्षस)
१०) घराबाहेरच्या --------- वेलीवरून चढून ते खिडकीच्या पट्टीवर उभे राहिले.(सायलीच्या,मधुमालतीच्या,जाई-जुईच्या)
११) बंडूने --------- शिडं बनवून काड्यांना चिकटवली. (कापडाची,कापसाची,कागदाची)
१२) --------- प्रकाशात त्या बारा होड्यांचा ताफा नदीतून जात होता. (चंद्राच्या,चांदण्यांच्या,चंद्रकिरणांच्या )

१३) समानार्थी शब्द शोधा. 2

i) जल- (पाणी,प्राणी,नदी) ii)कथा- (कविता,गोष्ट,नाटक)
iii) उंदीर- (घूस, मुंगूस, मूषक) iv) प्रकाश- (उजेड,सकाळ,प्रभात)

१४)विरुद्धार्थी शब्द शोधा. 2

i) हुशार x (बुद्धिमान,लबाड,मूर्ख) ii)प्रसिद्धx (अप्रसिद्ध,नाप्रसिद्ध,बेप्रसिद्ध)

iii) शक्य x (नाशक्य,बेशक्य,अशक्य) iv) ठेंगू x (उंच,बुटके,जाड़े)

१५) वचन बदला. 2

i) चिमणी- (चिमण्या,चिमणे,चिमिणी) ii) घर- (घरी,घरात,घरे)

iii) सुट्टी- (सुट्टा, सुट्ट्या,सुट्टे) iv) तारा- (तारे,तार,तारका)

१६) लिंग बदला. 2

i) म्हातारी- (म्हातारा,आजोबा,बाबा) ii) लेखक- (लेखनिक,लेखिका,लेखक)

iii) आई- (मामा,वडील,आजोबा) iv) पाहुणा- (पाहुणी,पाहुणे,पाहुणचार)

१७) नाम ओळखा. 2

i) क) गंगा ख) सुंदर ग) ती घ) आहे

ii) क) हुशार ख) निळा ग) राधिका घ) खेळते

१८) सर्वनाम ओळखा. 2

i) क) हिरवा ख) मोगरा ग) त्याला घ) आवडतो

ii) क) तिने ख) केसात ग) गजरा घ) माळला

१९) विशेषण ओळखा. 2

i) क) दुष्यंत ख) प्रसिद्ध ग) राजा घ) होता

ii) क) दिशिताला ख) तिने ग) सुंदर घ) म्हटले

२०) क्रियापद ओळखा. 2

i) क) प्रियाने ख) छान ग) गाणे घ) गायले

ii) क) बापरे! ख) पाहिला ग) मोठा घ) साप

विभाग 'ब'

प्रश्न ३ एका वाक्यात उत्तरे लिहा.(कोणतेही ६) 6

१) म्हातारी ढगात काय भरडते?
२) मुग्धाच्या शाळेत कोणकोणत्या स्पर्धा झाल्या?
३) समारंभाला प्रमुख कोण आले होते?
४) नानाकाका आनंदाने का डोलत होते?
५) झाडाच्या आडोशाला कोण लपून बसले होते?

६) कवितेतील मुलाला आकाशात केव्हा उडावेसे वाटते?
७) ठेंगू खिडकीच्या पट्टीवर कसे पोहोचले?
८) बंडूने कशाच्या होड्या बनवल्या?

प्रश्न ४ थोडक्यात उत्तरे लिहा.(कोणतेही ३) 6

१) पाहुणे लेखक वहीमध्ये काय लिहित असत?
२) नानाकाकांनी उंदीर पकडायला काय केले?
३) उंदरांनी भजी खाण्यासाठी काय युक्ती केली?
४) सगळ्यांना घाईघाईने जंगलाची जागा का सोडावी लागली?
५) सशाने ठेंगूंना बंडूचे नाव का सुचवले?

प्रश्न ५ अ) कविता पूर्ण करा.(कोणतीही १) 3

१) प्रकाशातले -------- तुम्ही ---------- रूसा,
हसा --------- हसा .
२) सुट्टीच्या --------- वाटते, खुशाल ---------उडावे,
-------------- घसरगुंडीवर , खाली-वर, वर-खाली व्हावे.

आ) दोन म्हणी लिहा . 2

प्रश्न ६ अ) जोड्या लावा. 2

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) खळखळणारे- | पक्षी |
| २) फडफडणारे- | वारा |
| ३) किलबिलणारे- | पाणी |
| ४) घोंघावणारा- | पंख |

आ) लपलेले शब्द शोधा.(कोणतेही ३) 3

जसे: भारतात- भात, भार,भाता,तात.

१) शिखरावर- २) पाऊसधारा- ३) अंधारावर-

४)नासाडी- ५) कपाळावर-

प्रश्न ७ अ) प्रत्येकी दोन-दोन नावे लिहा.(कोणतेही ४) 8

१) फुले- २) फळे- ३) भाज्या-

४)पक्षी - ५) प्राणी- ६) रंग-

आ) खालील अक्षरांची बाराखडी लिहा.(कोणतेही २) 2

१) क- २) म- ३) प- ४) स-

प्रश्न ८ खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे दहा ते बारा ओळींचा निबंध लिहा. 8

१) माझे कुटुंब (मुद्दे-घर- घरातील सदस्य- आई-वडील ,भाऊ-बहीण,-आजी आजोबा –त्यांची कामे –अभ्यास )
२) माझी शाळा (मुद्दे- तुमचे नाव- शाळेचे नाव-वर्ग खोल्या –वाचनालय- प्रयोगशाळा-खेळ )
३) माझे गाव (मुद्दे- गावाचे नाव- प्रदेश- गावाची भाषा- सण –प्रसिद्ध पदार्थ- प्रसिद्ध खेळ)

---